# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 132/2022 Dt : 23/05/2022

प्रती,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:– दिनांक ०६ जुन हा दिवस शिवराज्य दिन म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ:– १) उशिनाग/आस्था/शिवस्वराज्य दिन/२८७३/२०२२, दिनांक १९/०५/२०२२
२) शासन निर्णय क. संकिर्ण–२०२१/प्र.क्र विशी–५ दिनांक ०३ जुन २०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते कि, गोंडवाना विद्यापीठ संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालयामध्ये ०६ जुन हा दिवस " **शिवस्वराज्य दिन** " म्हणुन साजरा करावे तसेच शासन निर्णयानुसार कार्यक्रमाचे आयोजन करुन त्याचा अहवाल व निवडक फोटो रासेयो विभाच्या ई मेल वर nssdsw.gug@gmail.com सादर करावे, ही विनंती.

डॉ. श्याम खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

'६ जून' हा दिवस राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण -२०२१ /प्र.क्र.३०/विशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३ जून, २०२१

शासन परिपत्रक :

रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठासही मन न दाखवणे, अशी आज्ञा देणारा इतिहासातील पहिला राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. परकीय आणि स्वकीय अशा जुलमी सत्ताधिशांशी वतनदारांशी अनेक लढाया, युध्दे लढून या महाराष्ट्र भूमीत स्वराज्याची निर्मिती केली. जुलमी राजवटी संपुष्टात आणणेसाठी सर्व जाती-धर्माच्या अठरापगड बारा बलुतेदार, जिवाभावाचे मावळे एकत्र करुन हा लढा दिला. जनतेसाठी कसे राज्य करावे याचा आदर्श निर्माण केला. आपल्या राज्यातील जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी अनेक वटहुकूम काढले. मराठी भाषेतून राज्यकारभार चालविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यभाषा व्यवहारकोश तयार केला होता. या ग्रंथामध्ये फारसी शब्दांच्या संदर्भासाठी संस्कृत शब्द दिलेले आहेत. या ग्रंथाद्वारे महाराजांनी व्यवहाराचे मराठीकरण करण्याचा प्रयत्न केला.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषाच्या, लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजे ६ जून, १६७४ म्हणजेच **"शिवराज्याभिषेक दिन"** होय. हे रयतेचे राज्य शाश्वत, चिरंतन रहावे म्हणून या दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता व शिवाजी महाराज छत्रपती झाले होते. याच दिवशी स्वराज्याचे सार्वभौमत्व दुर्ग रायगडाच्या राजसदरेवरुन घोषित झाले. याच दिवशी श्री शिवराज्याभिषेक शकाची निर्मिती करुन महाराज शककर्ते ही झाले, तो हा शुभदिन होय. याच पवित्र दिवशी शिवकालगणनेला प्रारंभ झाला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिवस स्वराज्याची, सार्वभौमत्वाची, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. हा दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याची मागणी विविध स्तरातून होत आहे.

ही बाब विचारात घेऊन दरवर्षी दिनांक '६ जून' हा दिवस संपूर्ण राज्यातील अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये **"शिवस्वराज्यदिन"** म्हणून साजरा करण्यात यावा. दरवर्षी या दिवशी राज्यातील

सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये सकाळी ११.०० वा. सर्व पदाधिकारी, अधिकारी / कर्मचारी व विद्यार्थी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस / पुतळयास अभिवादन करावे व महाराष्ट्र गीत आणि राष्ट्रगीताचे गायन करावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे महान कार्य विद्यार्थ्यांच्या मनावर प्रतिबिंबित व्हावे या दृष्टीने शिवचरित्रपर व्याख्यानांचे, पथनाटयांचे व इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. महाराजांच्या गड किल्ल्यांची विद्यार्थ्यांना महती कळावी म्हणून गड किल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन / लघुपट प्रदर्शन करण्यात यावे. तसेच निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गीत गायन/पोवाडा गायन स्पर्धा, क्रिडा व इतर स्पर्धांचे/उपक्रमांचे आयोजन व सामाजिक संदेश देणारी शिवज्योत रॅलीचे आयोजन करुन हा दिवस साजरा करावा.

हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२१०६०४१११३१४२५१०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra ...
Date: 2021.06.04 11:43:41 +05'30'

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
२. मा. राज्य मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
३. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक,
४. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे/संचालक तंत्रशिक्षण, मुंबई /संचालक, कला संचालनालय, मुंबई
६. निवडनस्ती (विशि-५)